# 'साय-फाय' एकांकिका स्पर्धेतून सायबर सुरक्षा जनजागृती

**मुंबई । प्रतिनिधी**

क्विक हील फाऊंडेशन, थिएटर अकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलिस यांचा संयुक्त उपक्रम 'साय-फाय करंडक'साठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे.

यासाठी महाविद्यालय, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

साय-फाय करंडक २०१७च्या पहिल्या आवृत्तीत १०० पेक्षा अधिक टीमनी सहभाग नोंदवत ही स्पर्धा यशस्वी केली होती. थिएटर अकॅडेमी आपले अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध नाट्यकर्मी प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कान्या-कोप-यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल.